# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३१०/२०२१**

**विषय : पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुधारित वेळापत्रकाबाबत.**

**संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक शै. प्रवेश/३९१३ दि. २३/१०/२०२१**

कृपया वरील संदर्भीय परिपत्रकांचे अवलोकन व्हावे. त्यानुसार पीएच्.डी. प्रवेशासाठी विहित प्रक्रियेनुसार करावयाच्या कार्यवाहीमध्ये काही बदल प्रस्तावित असल्यामुळे, सदर परिपत्रकानुसार तुर्तास पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेच्या कार्यवाहीचे वेळापत्रक पुढे ढकलण्यात येत आहे.

यापुढे असे ही कळविण्यात येते की, यापुर्वी झालेल्या प्रवेशामध्ये मान्य असलेल्या प्रवेश क्षमतेनुसार आरक्षण ठरविण्यात येऊन त्यानुसार प्रवेश करण्यात आलेले आहेत. सदर कार्यपध्दतीनुसार सर्व मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने मार्गदर्शकांकडील पूर्ण जागा भरल्या जात नाहीत. तसेच काही प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध असूनही त्याना प्रवेश घेता येत नाही. सदर बाब विचारात घेता, संबंधित विद्यापीठ विभाग /संशोधन केंद्र येथे त्या त्या विषयासाठी कार्यरत असलेल्या मार्गदर्शकांकडे मान्य असलेली प्रवेश क्षमता एकत्रित विचारात घेवून पीएच्.डी. अभ्यासक्रमासाठी संवर्गनिहाय प्रवेश क्षमता ही विद्यापीठ समितीमार्फत जिल्हानिहाय शिबीर आयोजित करून निर्धारित करण्यात येणार आहे. त्याबाबतचे सुधारित वेळापत्रक लवकरच विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सबब, मा. विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग व मा. प्राचार्य/समन्वयक, सर्व मान्यताप्राप्त संशोधन परिसंस्था यांना विनंती की, सदर बदलांची नोंद घेवून त्यानुसार आपल्या केंद्रावरील संबधित नोंदणीकृत विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे कळविण्यात यावे.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/४०३१ )
दिनांक : ३०/१०/२०२१ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

Scanned with CamScanner